REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.


# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख २१ सप्टेंबर, १९३८ अंक ३८



# किर्लोस्कर

**२५ फुटांहून खोल विहिरीसाठी किर्लोस्कर हुगळी पंपाची कामगिरी लोकांना फारच पसंत पडली आहे.**

कारखान्याचे प्रतिनिधी आपल्यास भेटतील, त्यांना आपली गरज कळवा. म्हणजे आपल्या उपयोगी पडेल अशा किर्लोस्कर पंपाची निवड ते करून देतील किंवा थेट कारखान्यास लिहा. म्हणजे सविस्तर माहिती दिली जाईल.

## हुगळी पंप

किर्लोस्कर हात व पावर पंपांचा सचित्र कॅटलॉग मागवा।

**किर्लोस्कर बंधु लि. : : किर्लोस्करवाडी, सातारा**

## पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एरोमाफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

## The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.




**स्त्रियांचा आजार** म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगां-वर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहीसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )**
२५।३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

# विविध माहिती

### विमा-विषयक कायद्याची अंमलबजावणी

विमा-विषयक नवीन कायद्याच्या अंमलबजावणीस १ एप्रिल, १९३९ रोजीं प्रारंभ होईल, असें समजतें. हा कायदा अंमलांत आणण्यापूर्वी त्यांत कांहीं दुरुस्त्या करणें हिंदुस्थान सरकारास आवश्यक वाटत आहे. योग्य त्या दुरुस्त्या एका बिलाचे स्वरूपांत मध्यवर्ती विधिमंडळापुढें मांडण्यांत येतील.

### उद्योग मंत्र्यांची परिषद्

कॉंग्रेस सत्तेखालील प्रांतांतील उद्योग खात्यांच्या मंत्र्यांची परिषद् मुंबई येथें ह्या महिना अखेर भरणार आहे.

### ट्रेझरी बिलांवर १२ आ. ११ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं दोन कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १२ आ. ११ पै इतका पडला.

### स्वीडनमध्यें रेडिओचा प्रसार

स्वीडनमध्यें एकूण ११½ लक्ष रेडिओ चालू आहेत. म्हणजे, प्रत्येक हजार लोकवस्तीस १८४ रेडिओ असें प्रमाण निघतें.

### जागतिक व्यापारांतील मंदी

आंतरराष्ट्रीय व्यापारांतील मंदी अद्याप कमी होत नसून ती वाढतच आहे. १९३८ च्या पहिल्या सहामाहींतील व्यापार १९३७ च्या तत्सम मुदतींतील व्यापाराचे मानानें शेकडा १० टक्क्यांनीं कमी होता. जागतिक आयात शेकडा ९·३ टक्क्यांनीं आणि जागतिक निर्गत शेकडा ११ टक्क्यांनीं कमी झाली.

### बंदुकांचे परवाने

१९३७ सालीं बंदुकीच्या वापराचे परवानगी मागणारे ४२० अर्ज मुंबई सरकाराकडे आले. ह्या अर्जदारांपैकीं २३६ लोकांस परवाने मिळाले. त्यांपैकी १५४ युरोपिअन आणि अँग्लोइंडियन व ९६ हिंदी अर्जदार होते.

### रेडिओच्या परवान्यांच्या संख्येंत वाढ

जुलै, १९३८ मध्यें रेडिओचे २,१६१ नवीन परवाने हिंदुस्थान सरकारनें दिले. ह्या परवान्यांची प्रांतानिहाय वर्गवारी खालीलप्रमाणें होतीः—मुंबईः ६०५; बंगालः ५०७; पंजाबः ३०४; संयुक्त प्रांतः १९८. कोणत्याच वर्षांतील जुलै महिन्यांत ह्यापूर्वी इतके नवीन लायसेन्स दिले गेले नव्हते.

### एका वर्षांत पंधरा चौकशी कमिट्या

मुंबई प्रांतामध्यें कॉंग्रेस पक्षानें जुलै १९३७ मध्यें मंत्रिपद स्वीकारल्यापासून आतांपर्यंत सरकारनें पंधरा चौकशी कमिट्या नेमल्या आहेत.

### रेडिओंची वाढती आयात

हिंदुस्थानामध्यें रेडिओ व त्यास लागणारें साहित्य ह्यांची आयात झपाट्यानें वाढत आहे आणि त्यांत स्वस्त जपानी रेडिओंचा मोठा भरणा आहे.

### हिंदी रेडिओस उत्तेजन ?

एका हिंदी कारखानदारानें मद्रास प्रांतिक सरकारास रेडिओ पुरविण्याचा मक्ता मागितला आहे. प्रांतिक कार्यक्रम ज्यांतून ऐकतां येतील अशा रेडिओस ३० रुपये आणि संबंध हिंदुस्थानांतील कार्यक्रम ऐकतां येतील अशा रेडिओस ६० रुपये ह्या दरानें रेडिओ पुरविण्याची त्याची तयारी आहे.

### कॉमन्स सभेंतील डायरेक्टर

ब्रिटिश कॉमन्स सभेचे सभासद निरनिराळ्या कंपन्यांचे डायरेक्टर आहेत. अशा डायरेक्टरशिप्सची एकूण संख्या ८०६ भरते.

### अभागी ज्यू लोकांचा देशत्याग

जर्मनीमधील जाचास कंटाळून देशत्याग करणाऱ्या सुमारें ५० ज्यू लोकांची एक टोळी चीन देशाकडे चालली आहे. सर्व नातेवाईकांस सोडून आणि निष्कांचन होऊन त्यांस जावें लागत आहे. चीनमध्यें गेल्यावर काय करावयाचें, हें त्यांचें कांहींच ठरलेलें नाहीं. त्यांचेपैकीं सर्वांचीच चीनकडील ही पहिली खेप आहे.

### मि. बॅक्स्टर ह्यांची नेमणूक

मुंबई सरकारच्या पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटचे माजी सेक्रेटरी, मि. बॅक्स्टर, ह्यांची टाटा आयर्न अँन्ड स्टील कंपनीच्या जमशेदपूर येथील पाणीपुरवठ्याच्या योजनेवर देखरेख करण्यासाठीं कंपनीनें नेमणूक केली आहे.

### विमा कंपनीस दंड

कंपन्यांच्या रजिस्ट्रारनें इंडियन लाइफ अॅशुअरन्स कंपनीज् ॲक्टाच्या ३४ व्या कलमाखाली मुंबईच्या चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट कोर्टांत मॉडर्न इन्शुअरन्स कंपनीवर दावा केला होता, त्याचा गेल्या आठवड्यांत निकाल लागून कंपनीस ७५ रुपये दंड झाला. कंपनीच्या डायरेक्टरांवरहि दावा करण्यांत आला होता, त्यांपैकीं दोघांस प्रत्येकी ४० रुपये दंड झाला. कायद्याप्रमाणें जून, १९३४ अखेर संपणाऱ्या वर्षाबाबत कंपनीनें कंट्रोलर ऑफ करन्सीकडे ५,४८८ रुपये दर्शनी किंमतीचे सरकारी रोखे अनामत ठेवावयास पाहिजे होते ते कंपनीनें ठेवले नाहींत, असें रजिस्ट्रारचें म्हणणें होतें.

### आइस्क्रीम

दरवर्षी ग्रेटब्रिटनमध्यें पांच-सहा कोटि रुपये किंमतीचें आइस्क्रीम खपतें. तें तयार करणाऱ्या दोनशे मंडळ्या आहेत आणि त्यांच्या प्रचंड कारखान्यांत तें यांत्रिक शक्तीनें हस्तस्पर्श न होतां बनवलें जातें.

### कादंबरीकाराचा प्रचंड उद्योग

मि. ई. फिलिप्स ऑपनहाइम ह्या ७३ वर्षें वयाच्या ब्रिटिश कादंबरीकारानें आपली १५१ वी कादंबरी नुकतीच पुरी केली आहे.गोष्टी,प्रवासवर्णनें इत्यादिकांबरोबर दरवर्षी दोन कादंबऱ्या लिहून प्रसिद्ध करण्याचा त्याचा क्रम कित्येक वर्षें चालला आहे.

### " ऑस्टमार्क "

ऑस्ट्रियामध्यें प्रवास करणाऱ्या मोटारवाल्या उतारूंस, त्या देशाचें नांव आतां "ऑस्टमार्क" असल्याचें मुद्दाम सांगण्यांत येतें.

### रेडिओचा प्रसार

१९३७ सालीं सबंद जगांत मिळून ७ कोटि रेडिओ सेट्स वापरांत होते. १९३६ सालाचे मानानें ही संख्या ६५ लाखांनीं मोठी आहे. अमेरिकेंत ३ कोटि, १८ लक्ष रेडिओ आणि युरोपांतील देशांपैकीं जर्मनींत सर्वांत अधिक म्हणजे ९१ लक्ष रेडिओ चालू होते.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| ४-९-३८ ते १०-९-३८ | ८०१ |
| ११-९-३८ ते १७-९-३८ | ३,५४,५८८ |
| २१-९-३१ ते १७-९-३८ | ३,१९,३२,०६,३६१ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४५८ |
| २ हिंदुस्थानचा लष्करी खर्च ... ... | ४५९ |
| ३ कंपन्यांचे हिशेब तपासनीस ... ... | ४६० |
| ४ बिचारे व्हाइसरॉय!... | ४६० |
| ५ संस्था मोडण्याचे वाम मार्ग ... ... | ४६० |
| ६ स्फुट-विचार ... | ४६१ |
| सोन्याची साठवण—जाहिरात कशी असावी!—जर्मनीची दमदाटी—कारखानदार-कामगार तंट्यांबाबत कायदा—मोटार-वाहतूक बिलाचें तिसरें वाचन | |
| ७ सहकारी चळवळ ... | ४६३ |
| ८ मुंबई प्रांतांतील मोटारी आणि त्यांचे अपघात | ४६४ |
| ९ सोलापूर जिल्ह्यांतील लँड मॉर्गेज बँक ... | ४६५ |
| १० निवडक बाजारभाव | ४६७ |



# अर्थ

बुधवार, ता. २१ सप्टेंबर, १९३८


## हिंदुस्थानचा लष्करी खर्च

मध्यवर्ती कायदेमंडळाच्या दोन्ही गृहांमध्यें हिंदी लष्कराचे बाबतींत बिनसरकारी सभासदांच्या ठरावावर एकाच वेळीं चर्चा व्हावी आणि त्याच प्रसंगीं साम्राज्य सरकारानें हिंदी लष्करी खर्चाच्या बोजापैकीं विशिष्ट भाग स्वतः उचलण्याचें अभिवचन दिलें असल्याची घोषणा फडनवीसांनीं करावी, हा योगायोग समजला पाहिजे. हिंदुस्थानांतील लष्करावर होणाऱ्या खर्चाचें नियंत्रण करण्यासाठीं लोकनियुक्त सभासदांचें संख्याधिक्य असलेली एक कमिटी नेमण्यांत यावी आणि तिनें ह्या खर्चांत कोठें व किती बचत करतां येईल हें पहावें ह्या आशयाचा ठराव मध्यवर्ती असेंब्लींत चर्चेसाठीं पुढें आला होता. ह्या देशांतील सैन्याच्या शस्त्रसामुग्रींत सुधारणा होणें तर अत्यावश्यक आहे; पण तीस लागणारा खर्च हिंदी तिजोरीस झेपण्यासारखा नाहीं. तेव्हां, हा जादा खर्च ब्रिटिश तिजोरीनें सोसल्यावांचून गत्यंतर नाहीं अशी आपली बाजू हिंदुस्थान सरकारनें साम्राज्य सरकारापुढें मांडल्यानें सदरहु खर्च विशिष्ट मर्यादेंत आपण देऊं असें ब्रिटिश प्रधानमंडळानें ठरवलें आणि ह्या संबंधांत अधिक चौकशी करून लष्करी पुनर्घटनेच्या बाबतींत शिफारसी करण्यासाठीं कमिटी इकडे पाठवण्याचें निश्चित केलें. मध्यवर्ती असेंब्लींत लष्करी खर्चाविषयींच्या ठरावावर भाषणें होत असतां सर जेम्स ग्रिग ह्यांनीं साम्राज्य सरकारनें आखलेल्या वरील धोरणासंबंधीं घोषणा केली. खर्चाची बाब फडनवीसांच्या कार्यक्षेत्रांत येत असल्यानें साम्राज्य सरकारचें उदार धोरण हिंदुस्थानच्या सांपत्तिक हितास परिपोषक आहे असें सांगण्याचें आणि त्या योगानें लोकपक्षाचें समाधान झालें पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करण्याचें काम त्यांनीं केलें. साम्राज्य सरकारची नवी योजना हा केवळ एक हप्ता असून तिचा विस्तार होऊन हिंदी लष्कराच्या सुधारणेचा आणखी बोजा तें सरकार उचलील असें सर महमद झाफरुल्लाखान ह्यांनीं सांगितलें. परंतु असेंब्लीमधील हिंदी सभासदांच्या मनांवर ह्या विचारांचा कांहींच परिणाम झाला नाहीं आणि त्यांनीं पुरस्कार केलेला ठराव प्रचंड बहुमतानें पास झाला.

हिंदुस्थान सरकारचें लष्करविषयक धोरण, त्याचा लष्करी खर्च आणि येथील सैन्याची घटना ह्या तीन महत्वाच्या प्रश्नांचे संबंधांत हिंदी लोकमत अनेक वर्षे व्यक्त केलें जात असून त्यास अनुसरून सुधारणा होत नाहीं अशी सार्वत्रिक तक्रार आहे. परवां असेंब्लीमध्यें चर्चा होऊन हिंदुस्थान सरकाराविरुद्ध ठराव पास झाला त्याप्रसंगीं ह्याच विषयावर हिंदी लोकनियुक्त सभासदांनीं पुन्हां एकवार स्पष्टपणानें लोकमत व्यक्त केलें. साम्राज्य सरकाराच्या उदार धोरणामुळें सध्याच्या खर्चांत सुधारलेली फौज हिंदुस्थानास लाभणार आहे, ह्या एकाच मुद्यास सर जेम्स ग्रिग ह्यांनीं स्वतःस मर्यादित करून इतर विचार अप्रस्तुत म्हणून सोडून दिले. लष्करी धोरण ठरवणें लोकप्रतिनिधि सभेच्या अधिकाराबाहेरचें आहे आणि तें अनेक वर्षे तसें रहाणार. त्याचप्रमाणें, हिंदी फौजेचें हिंदीकरण झाल्यास लष्करी खर्च फारसा कमी होईल असें वाटत नसून तो प्रश्न स्वतंत्र आहे. लष्कराचें हिंदीकरण ही काळाची गोष्ट आहे आणि तिचा लष्करी खर्चाच्या प्रश्नाशी घोटाळा करण्यांत अर्थ नाहीं. सध्याचा जगांतला आणीबाणीचा प्रसंग लक्षांत घेतला असतां हिंदुस्थानचें लष्करी धोरण, सैन्याच्या खर्चांत काटकसर आणि त्याचें हिंदीकरण ह्या गोष्टींवर भर देणें अविचाराचें आहे असा सर जेम्स ग्रिग यांच्या भाषणाचा आशय होता. हिंदुस्थान देशाच्या ऐपतीच्या मानानें त्याचा लष्करी खर्च अधिक आहे आणि हिंदी फौजेचा बराचसा उपयोग साम्राज्य रक्षणास होत असल्यानें त्यांतला योग्य हिस्सा साम्राज्य सरकारनें उचलला पाहिजे ह्या गोष्टी इतक्या उशीरानें त्या सरकारानें अप्रत्यक्ष रीतीनें मान्य केल्या आहेत. पण आजपर्यंत झालेल्या दिरंगाईमुळें ह्या कबुलीनें हिंदी लोकमताचें समाधान होणें अशक्य आहे. हिंदी लष्कराचें हिंदीकरण लांबणीवर पडलें आहे आणि लष्करी धोरण व खर्च ह्यांवर हिंदी जनतेचें नियंत्रण अनेक वर्षे येणें अशक्य दिसतें. ह्या परिस्थितींत सरकाराच्या विरुद्ध मध्यवर्ती असेंब्लींत ठराव पास झाला आणि साम्राज्य सरकारच्या उदारपणाच्या धोरणाची घोषणा झाली तिचा परिणाम सभासदांच्या मनावर झाला नाहीं ह्यांत आश्चर्य नाहीं. जगांतील सर्व राष्ट्रांचे लष्करी खर्च बेसुमार वाढले आहेत, त्यांची स्वसंरक्षणाची तयारी जारीनें चालली आहे आणि सुधारलेल्या पद्धतीची खर्चाची लष्करी सामुग्री वाढत्या प्रमाणांत वापरली जात आहे. ह्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत आणि हिंदुस्थानानें राष्ट्रीय दृष्टीनें त्या हिशेबांत घेणें आवश्यक आहे ह्यांत शंका नाहीं. तथापि, हिंदी लष्करावर व त्याच्या खर्चावर हिंदी लोकांचा ताबा नाहीं ह्यामुळें ह्या गोष्टी लोकांस पटत नाहींत हें विसरून चालावयाचें नाहीं. सर जेम्स ग्रिग आणि लोकपक्ष ह्यांच्या दृष्टिकोनांत महत्त्वाचा भेद असेंब्लीमधील चर्चेत दिसून आला, तो ह्यामुळेंच होय. हिंदुस्थानाच्या रक्षणाची जय्यत तयारी असावी आणि तिच्यासाठीं आवश्यक असलेला खर्च करणें अपरिहार्य आहे हें कोणास समजत नाहीं? सर्वांस समजतें. पण राष्ट्राचें रक्षण त्या राष्ट्राच्या लोकांनींच केलें पाहिजे आणि लष्करी घटना व खर्च ह्यांचें नियंत्रण त्यांचेच हातांत असलें पाहिजे हें मूलभूत तत्त्व आहे. साम्राज्य सरकारानें तें तत्त्व आणि त्याचे संबंधांतली हिंदी भूमिका लक्षांत घेतली पाहिजे.

## कंपन्यांचे हिशेब-तपासनीस

### ( सन १९३६ च्या कंपनी कायद्यानें केलेल्या कांहीं दुरुस्त्या )

संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यांचा हिशेब-तपासनीस हा रजिस्टर्ड अकौंटंट असला पाहिजे. खासगी संयुक्त भांडवलाच्या हिशेब-तपासनीसावर हें बंधन नाहीं; तथापि, ती मंडळी दुसऱ्या सार्वजनिक मंडळीची दुय्यम संस्था असल्यास तिचे हिशेब रजिस्टर्ड अकौंटंटनेंच तपासले पाहिजेत. कंपनीचा डायरेक्टर अगर अधिकारी, डायरेक्टराचा अगर अधिकाऱ्याचा भागीदार, त्यांच्या हाताखालील नोकर, कंपनीचा देणेकरी, ह्यांची कंपनीच्या ऑडिटरचे जागीं नेमणूक करतां येणार नाहीं. दुय्यम कंपनी जरी खासगी असली, तरी तिच्या हिशेबतपासणीचेबाबत सार्वजनिक कंपन्यांविषयींचे नियमच लागू केले जातील. ऑडिटरच्या नेमणुकीनंतर तो जर कंपनीचा देणेकरी झाला, तर त्याची नेमणूक आपोआप रद्द होते.

दुरुस्त कायद्यान्वयें, ऑडिटरनें केवळ ताळेबंदासंबंधीं आपला रिपोर्ट द्यावयाचा नसून, नफा--तोटा पत्रकावरहि त्यानें अभिप्राय दिला पाहिजे. ताळेबंदाप्रमाणें नफा-तोटा पत्रकांतहि निर्दिष्ट करावयाच्या बाबी कायद्यानें निश्चित केलेल्या असल्यानें, हीं दोन्हीं पत्रकें कायद्याप्रमाणें तयार करण्यांत आलीं असल्याविषयीं ऑडिटरनें शेरा दिला पाहिजे. ऑडिटरचा रिपोर्ट कायद्यांतील कलमान्वयें नसल्यास, त्याबद्दल ऑडिटरला १०० रुपयांपर्यंत दंड होऊं शकेल. कंपनीच्या ज्या सभेस ऑडिटरनें तपासलेले हिशेब सादर केले जावयाचे असतील, तिला हजर रहाण्यास ऑडिटरला निमंत्रण मिळालें पाहिजे. सभेंत हिशेबासंबंधीं खुलासा करण्याचा ऑडिटरला अधिकार आहे. मात्र सभेस हजर रहाण्याची ऑडिटरवर सक्ती नाहीं.

---

## बिचारे व्हाइसरॉय !

इंग्लंडच्या बाहेर सर्वांत महत्त्वाची ब्रिटिश अधिकाऱ्याची जागा येथील व्हाइसरॉयाची असून ती मोठ्या मानाची पण विलक्षण जबाबदारीची आहे असें सांगून एक इंग्रजी लेखक म्हणतो:—" असें असूनहि त्याचा वार्षिक तनखा अवघा अडीच लाख रुपये आहे. तो अपुरा पडल्यानें ह्या अधिकाऱ्यास आपल्या अन्य मिळकतींतून खर्च करावा लागतो. व्हाइसरायास त्याच्या कारकीर्दीमुळें स्वतःच्या खिशास चट्टा लावून घेणें प्राप्त होतें. पगारापेक्षाहि जास्त इतका अलावन्स असला तरी इतमामांत तो सर्व खपून जातो. बड्या लोकांस त्यास पाहुणचार द्यावा लागतो. विशिष्ट दर्जाच्या युरोपियनांस आणि सरकारी नोकरांस व्हाइसरीगल लॉजमध्यें जाऊन त्याच्या पंक्तीचा लाभ घेतां येतो. त्यासाठी त्यास निरनिराळ्या जातींचे आचारी ठेवावे लागतात. कलकत्त्यास एका महिन्याच्या अवधींत चार हजार पाहुण्यांस आपणांस जेवूं घालावें लागलें असल्याचा हिशेब लॉर्ड कर्झन ह्या व्हाइसरायांनीं केला होता. चमत्कारिक रीतीनें मिश्रित झालेलें मंत्रिमंडळ त्यास संभाळून घ्यावें लागतें. फाजील स्तुतीनें भरलेलीं भाषणें त्यास सहन करावीं लागतात आणि जड मेजवान्यांचें सेवन करावें लागतें. शांत एकांताचा व विश्रांतीचा एकहि क्षण त्याच्या वांट्यास येत नाहीं."

---

## आपली संस्था मोडण्याचे वीस मार्ग

[ एका अमेरिकन वर्तमानपत्रांतील, इंडियन मर्चंट्स चेंबरच्या मासिकांतून घेतलेला उतारा. ]

( १ ) सभेस हजर राहूं नका.

( २ ) हजर राहिलातच, तर उशीरा जा.

( ३ ) हवा नीट नसल्यास जाण्याचा विचारच करूं नका.

( ४ ) सभेस हजर राहिलातच, तर संस्थेच्या अधिकाऱ्यांविरुद्ध आणि इतर सभासदांविरुद्ध तक्रार करा.

( ५ ) स्वतः अधिकाराची कोणतीच जागा स्वीकारूं नका, कारण काम करण्यापेक्षा टीका करणें सोपें असतें.

( ६ ) तथापि, तुम्हांस कमिटींत घेतलें नाहीं, तर तक्रार करा आणि कमिटींत घेतलें तर तिच्या सभांस हजर राहूं नका.

( ७ ) अध्यक्षानें एखाद्या महत्वाच्या बाबतींत तुमचें मत विचारल्यास, कांहीं बोलूं नका परंतु सभा संपल्यानंतर इतर सर्वांस सल्ला देत चला.

( ८ ) तुम्हांस जेवढें करणें क्रमप्राप्त आहे, तेवढेंच करा; तथापि इतर सभासद उत्साहानें काम करूं लागले म्हणजे संस्था कंपूच्या ताब्यांत गेली आहे अशी ओरड सुरू करा.

( ९ ) आपली वर्गणी देणें शक्य तितका काळ तहकूब करा आणि जमल्यास अजीबात मुळींच देऊं नका.

( १० ) संस्थेनें चहापार्टी दिली म्हणजे विनाकारण थाटामाटावर खर्च होत आहे असें सर्वांस सांगत सुटा.

( ११ ) अल्पोपहाराचे प्रसंग घडवून आणले नाहींत, म्हणजे संस्था मृतावस्थेस गेली आहे असें जाहीर करा.

( १२ ) प्रमुख स्थानीं जागा दिल्यास ती विनयानें नाकारा.

( १३ ) अशी जागा न दिल्यास, सभासदत्वाचा राजीनामा द्या.

( १४ ) वर्गणीचें बिल मिळालें नाहीं, तर पैसे देऊं नका.

( १५ ) वर्गणी दिल्यानंतर बिल आलें तर संस्थेंतून बाहेर पडा.

( १६ ) संस्थेस तुम्हांस मदत कशी करतां येईल, हें तिला कळवूं नका, परंतु तिचा तुम्हांस उपयोग नसल्यास राजीनामा द्या.

( १७ ) संस्थेच्या व्यवस्थेंतील व्यंग शोधून काढा आणि तें सर्वांच्या नजरेस आणून राजीनामा द्या.

( १८ ) राजीनामा देण्याचा प्रत्येक वेळीं धाक घाला आणि आपल्या मित्रांसहि राजीनामा देण्यास प्रवृत्त करा.

( १९ ) सभेमध्यें एका बाजूनें मत द्या आणि त्याचे विरुद्ध वर्तन करा.

( २० ) कांहीं माहिती मागितल्यास ती पुरवूं नका.


### ☞ फर्म, कंपनी आणि सोसायटी

यांचा कायदा, नियम यासंबंधीं विवेचनात्मक लेखमाला "न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांत क्रमशः सुरू आहे. त्याचप्रमाणें मुंबई हायकोर्टाचे निवाडे व वेळोवेळीं होणारे प्रान्तिक कायदे प्रत्येक अंकांत प्रसिद्ध होतात. फर्म, कंपनी आणि सोसायटी यासंबंधीं येत असलेली लेखमाला मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें मासिक अवश्य संग्रहीं ठेवा. वा. व. ट. ख. सह फक्त ५ रु. म. ऑ. नें पाठवा. नमुना अंकासाठी सात आण्याचीं तिकीटें पाठवा.

मॅनेजर,

"न्यायबोध" मासिक, नागपूर शहर.

## स्फुट विचार

### सोन्याची साठवण

युरोपांतील राजकीय अस्वस्थता आणि फ्रेंच चलनाची अस्थिरता ह्यांचे योगानें गेल्या बारा महिन्यांत तिकडे सोनें साठवण्याच्या प्रघातास विशेष महत्व प्राप्त झालें आहे. आपली मिळकत सोन्याच्या स्वरूपांत अडकवून ठेवणें वेडेपणाचें आहे अशी समजूत पाश्चात्य देशांत दृढमूल झाली आहे आणि हिंदी लोकांची सोन्याविषयींची आवड हानिकारक व मागसलेपणाची निदर्शक असल्याबद्दल टीका होत आली आहे. परंतु अलीकडे सोन्याचीं नाणीं आणि चिपा खरेदी करून जवळ ठेवण्याची प्रवृत्ति युरोपांत वाढली आहे. सोन्याचीं नाणीं बाळगण्यास इंग्लंडमध्यें कायदेशीर प्रतिबंध होता, तो दूर करण्यांत आला आहे. त्याचप्रमाणें, सोन्याच्या तारणावर कर्ज देण्याची बँकांस बंदी करण्यांत आली होती तीहि उठली आहे. ह्या कारणानें सोण्याचीं नाणीं आणि चिपा खरेदी करण्याचे व्यवहार अलीकडे वाढले असून ह्या खरेदीस सहाय म्हणून ब्रिटिश बँकाहि सोन्याच्या तारणावर व्यापाऱ्यांस कर्ज देत आहेत. सोन्याच्या नाण्यांस तर विशेष मागणी आहे आणि त्यांतल्या सोन्याच्या किंमतीच्या मानानें ऐनजिनसी नाण्यांस जास्त किंमत येत आहे. धंदेवाले सोन्याची वायद्याच्या करारानें विक्री करीत आहेत आणि त्यासाठी बँकांकडून कर्ज काढून मालाच्या पुरवठ्याची व्यवस्था ठेवीत आहेत. ह्या कारणानें गिऱ्हाइक पाहूनच बँकांस सोन्याच्या तारणावरील व्यवहार करावे लागत आहेत. आर्थिक व्यवहारांच्या मुळाशीं असलेल्या विश्वासाचा आधार अजूनहि सोनें हाच आहे हें वर वर्णिलेल्या युरोपांतील प्रवृत्तीवरून स्पष्ट होत आहे. सोन्याचे दिवस आधुनिक सुधारणेच्या काळांत गेले असें एका वेळीं पाश्चात्य देशांत वाटत होतें. परंतु त्यानें आपलें प्राबल्य पुन्हां प्रस्थापित केलें आहे.

### जाहिरात कशी असावी ?

मालाची जाहिरात वस्तुस्थितीची निदर्शक असावी आणि त्यांत अतिशयोक्ति व भडकपणा असूं नये ही गोष्ट सर्वमान्य होण्यासारखी आहे. तथापि, मालाचे गुण फुगवून दाखवणें आणि त्यांत नसलेलेहि गुण त्यांत आहेत असें म्हणणें हा जाहिरातींचा दुरुपयोग मोठ्या प्रमाणांत दिसून येत असल्याची तक्रार युरोप आणि अमेरिका या देशांत व्यक्त केली जात आहे. ह्यामुळें मनुष्याचा स्वभाव, त्याची मनोरचना आणि त्याचे विचारप्रवाह ह्यांचें परिशीलन करून त्यांच्या प्रवृत्तीस अनुसरून धंदेवाल्यांनीं आपणांकडे गिऱ्हाइक आकर्षण्याचा प्रयत्न करावा ह्या कल्पनेस अमेरिकेंत अलीकडे चालना मिळाली आहे. गिऱ्हाइकापुढें मालाची परिस्थिति यथातथ्य मांडल्यास त्याचा खप कमी न होतां वाढण्याचाच संभव आहे असें मत कित्येकजण प्रतिपादीत आहेत. दारू गाळून विकणाऱ्या एका अमेरिकन कंपनीनें ह्या कल्पनेस अनुसरून खालील जाहिरात प्रसिद्ध केली आहे, ती मननीय आहे. "नित्याच्या जीवनास लागणाच्या अत्यावश्यक वस्तू सोडून आमची दारू लोकांनीं विकत घ्यावी अशी आमची इच्छा नाहीं. दारू ही चैनीची वस्तु आहे आणि ती तशीच गणली पाहिजे. चांगली दारू हुसकर आहे खरी; पण ती अगदीं मर्यादित प्रमाणांत घेतली आणि तिची किंमत अगाऊ दिली तर. हें विधान आमच्या स्वार्थाच्या विरुद्ध आहे असें वाटेल. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. 'अगोदर पैसे टाका' असें गिऱ्हाइकास म्हटल्यानें अखेर आमचा धंदा चांगला चालेल असा आम्हांस विश्वास वाटतो". वरील जाहिरातीच्या मुळाशीं असलेली कल्पना लक्षांत घेण्यासारखी आहे.

### जर्मनीची झेकोस्लोव्हेकियांत दमदाटी

महायुद्धाचे अखेर जेत्या राष्ट्रांनीं जित जर्मनीनें पुन्हां आपलें डोकें वर काढूं नये, अशा बेतानें त्यास हतबल आणि हतप्रभ करून टाकलें. जर्मनीचें आरमार, फौज व वसाहती काढून घेण्यांत आल्या आणि त्याचा मुलूख मर्यादित होऊन त्याच्या भोवतीं लहान लहान स्वतंत्र राष्ट्रांचें कोंडाळें बनवण्यांत आलें. ही व्यवस्था अबाधितपणानें चालावी म्हणून तिची देखरेख करण्यासाठी राष्ट्रसंघ स्थापन झाला. तथापि, आपली विपन्न स्थिति सुधारून पुन्हां आपलें राष्ट्रीय बल प्रस्थापित करण्याचा निश्चय जर्मनीनें केला आणि जेत्या राष्ट्रांच्या जुटींत बिघाड होईल, त्याचा पूर्ण फायदा घेण्याचा निश्चय केला. रशियाचें आणि राष्ट्रसंघाचें सूत फारसें कधींच जमलें नव्हतें आणि राजकीय महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन जपान आणि इटली हीं राष्ट्रें त्यांतून फुटून बाहेर पडलीं. जर्मनी, इटली आणि जपान ह्यांची मैत्री जमून त्यांचा गट राष्ट्रसंघास प्रतिस्पर्धी असा बनला. व्हर्सेईच्या तहाच्या अटी एकामागून एक झुगारून देण्याचा क्रम जर्मनीनें चालवला आणि राष्ट्रसंघानें तोंडपाटिलकी केली, तरी इंग्लंड व फ्रान्स हीं राष्ट्रें त्याच्या व्यवस्थेच्या संरक्षणार्थ शस्त्र उचलण्यास तयार नाहींत असें पाहून इटली, जपान व जर्मनी ह्यांनीं ॲबिसीनिया, चीन व युरोप ह्या बाजूंस युद्धें करून मुलूख जिंकला. ऑस्ट्रियामधील लोक जर्मन वंशाचे असल्यानें त्यांचा अंतर्भाव जर्मन राज्यांत झाला पाहिजे ह्या सबबीवर हिटलरनें तें राष्ट्र आपल्या मुलखास जोडलें. ॲबिसीनियाप्रमाणें त्या देशाच्या सहायास राष्ट्रसंघ धावून गेला नाहीं. जपान चीनचे लचके तोडीत आहे, त्यास राष्ट्रसंघाची मदत मिळूं शकत नाहीं. स्पेनमध्यें फ्रँकोला इटली उघडपणें सहाय करीत असतां त्याचा हात इंग्लंड व फ्रान्स धरूं शकत नाहींत. झेकोस्लोव्हेकिया ह्या नवीन बनवलेल्या राष्ट्राचा जर्मन प्रजा बहुसंख्य ज्यांत आहे असा तुकडा मुकाट्यानें घशांत टाकण्याचा बेत हिटलरनें केला आणि त्यासाठी तेथील जर्मनांस चिथवून त्यांची उठावणी केली. ऑस्ट्रियाप्रमाणें हा प्रदेशहि दमदाटी करून आपणांस सहज मिळतां येईल ह्या अपेक्षेनें हिटलरनें झेकोस्लोव्हेकियांत व्यूह रचला असून युद्धाची भीषण छाया जगावर पसरली आहे.

### कारखानदार-कामगार तंट्यांबाबत कायदा

कारखान्यांचे मालक आणि त्यांत काम करणारे कामगार ह्यांच्यामध्यें मजूरी, कामाचे तास इत्यादि अनेक बाबींसंबंधानें वाद उपस्थित होऊन त्यांचें पर्यवसान संप आणि कारखाने-बंदी ह्यांमध्यें होत असतें. ह्या संपांचा परिणाम कामकऱ्यांची मिळकत बुडणें, कारखान्यांतलें उत्पादन बंद पडणें आणि सामाजिक अस्वस्थता निर्माण होणें ह्यांत होतो. म्हणून, कामकरीवर्गाचा संपाबाबतचा हक्क कायम ठेवून तंट्यांची तीव्रता मर्यादित करणें आणि शक्य होईल तोंवर तडजोडीनें त्यांचा निकाल लावण्याची तरतूद करणें हीं कामें सरकारास करावीं लागतात. हिंदुस्थानांत मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारनें ह्या संबंधांत कायदे

केले आहेत. तथापि, अलीकडच्या परिस्थितीचा विचार करून कारखानदार आणि कामगार ह्यांच्या मधल्या तंट्यांविषयीं नवीन कायदा करण्याचें योजून मुंबईच्या प्रधानमंडळानें त्याचा मसुदा असेंब्लीपुढें मांडला आहे. ह्या बिलाच्या पहिल्या वाचनाचे प्रसंगीं त्याच्या मूलभूत तत्त्वावर कडाक्याचा वाद विधिमंडळांत झाला. कामकरी लोकांनीं एकदम संप पुकारूं नये आणि तडजोडीस वाव दिला जाऊन तंट्यांचा निकाल पूर्ण चौकशीअंतीं व्हावा हें प्रस्तुत बिलाचें प्रमुख तत्व आहे. संप करण्याचा हक्क कामकऱ्यांस असावा, पण तें त्यांचें शेवटचें निर्वाणीचें अस्त्र असावें आणि दोन पक्षांमधले तंटे तडजोडीनें मिटवण्याचा अवश्य प्रयत्न प्रथम व्हावा ही विचारसरणी आतां सर्वत्र मान्य झाली आहे. संप हें ध्येय नसून तें साधन आहे आणि कारखानदार व कामकरी ह्यांनीं आपलें म्हणणें तिऱ्हाइतांपुढें मांडून न्याय्य-निर्णय आपणांस मिळेल असा प्रयत्न करावा ह्यांत त्या दोघांचें आणि समाजाचें हित आहे ह्यांत शंका नाहीं. कामगार लोक संघटित असल्यास संप पुकारण्याचा फारसा प्रसंग येत नाहीं आणि सरकारच्या सहायानें केल्या जाणाऱ्या दोन बाजूंमधील वाटाघाटींनें कार्यभाग होतो, असा पाश्चात्य राष्ट्रांतला अनुभव आहे. कामकरीवर्गाच्या हिताच्या दृष्टीनेंहि संपाच्या पूर्वी तडजोडीचा प्रयत्न आवश्यक आणि इष्टफलदायी आहे कीं नाहीं ह्या प्रश्नाचा विचार प्रांतिक असेंब्लीपुढें असलेल्या बिलाच्या चर्चेत होणें अगत्याचें आहे.

---

### मोटार वहातुक बिलाचें तिसरें वाचन

मोटार वहातुक नियंत्रणाच्या बिलाचें तिसरें वाचन असेंब्लीमध्यें गेल्या आठवड्यांत पास झालें. रेलवेज आणि मोटारी ह्यांच्या वहातुकीचे धंद्यांपैकीं रेलवेजचा धंदा हा अधिक हिंदी आहे, अशी भूमिका लोकपक्षानें स्वीकारली, त्यामुळें सरकारी बिलाचा मार्ग सुलभ झाला. मोटार वहातुकीचें नियंत्रण करण्याचा अधिकार बिलानें प्रांतिक सरकारांकडे सोंपविला आहे, त्या अन्वयें कोणत्या प्रकारच्या मालाची कशी वहातुक चालावी, त्यास कोणते दर आकारण्यांत यावेत, इत्यादि प्रश्नांबाबत प्रांतिक सरकारांनीं नियम करावयाचे आहेत. मोटार वहातुक आणि रेलवे वहातुक ह्यांमधील अनिष्ट स्पर्धा थांबून रेलवेजचें नुकसान टळावें ह्या हेतूनें मुख्यतः वरील योजना करण्यांत आलेली आहे. सक्तीच्या विम्याचें तत्त्वहि असेंब्लीनें मान्य केलें आहे. सन १९४३ च्या सुमारास भाड्याच्या सर्व मोटारींचा विमा उतरलेला आढळून येईल. जगांतील सर्व देशांत कमी-अधिक प्रमाणांत मोटारींच्या वहातुकीचें नियंत्रण करण्यांत येत आहे आणि हिंदुस्थानांतहि तें येणें अपरिहार्य व इष्टहि होतें. रेलवेजच्या धोरणावर प्रांतिक सरकारांच्या मताचा प्रभावी परिणाम होण्यास वरील बिलांतील योजनेनें वाट मोकळी करून दिली आहे आणि त्यामुळें आडमार्गानें कां होईना, लोक प्रतिनिधींच्या मतास महत्त्व प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे.

---

### सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे नवे अध्यक्ष

सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अध्यक्ष सर फिरोज सेटना हे गेल्या आठवड्यांत निवर्तले. त्यांचे जागीं बँकेच्या डायरेक्टरांनीं सर एच. पी. मोदी ह्यांची नेमणूक केली आहे.


## ६ टक्के मासिक आंवर्क ठेव

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर-डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

---

**स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन**

त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतुद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या "चे योगेंच साधतां येते.

## कॉमनवेल्थ विमा कंपनी

## लिमिटेड, पुणें.

**ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.**

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

---

## दि प्रॉव्हिन्शिअल बँक

**ऑफ अिंडिया लिमिटेड**

**स्थापना १९३६**

मुख्य कार्यालय: २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम् स्टेशन) बंगलूर

शाखा: मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष: खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर: अेस्. पी. ठाकर.

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस्**: १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस्**: ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी**: दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट, पुणें.
एच. जी. गद्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें. २

### बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को. लँड मॉर्गेज बँक, लि.

जिल्हा सहकारी बँकांची केंद्रीभूत संस्था म्हणजे प्रांतिक सहकारी बँक, त्याचप्रमाणें प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांची केंद्रीभूत संस्था म्हणजे प्रांतिक लँड मॉर्गेज बँक, ही होय. मुंबई प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बँकेचें भरणा झालेलें भांडवल सुमारें ४ लक्ष रुपयांचें आहे. गेल्या वर्षी तिनें २० लक्ष रुपयांचीं ३¼% दराचीं डिबेंचर्स विक्रीस काढलीं त्यांपैकी १६ लक्ष, १६ हजारांचीं डिबेंचर्स खपलीं आहेत. त्यांतील ३¾ लक्ष रुपयांचीं डिबेंचर्स सहकरि बँकांनीं घेतलीं असून बाकीचीं विमा कंपन्या, बँका आणि खाजगी व्यक्ती ह्यांनीं घेतलीं आहेत. गेल्या वर्षी बँकेकडे ११½ लक्ष रुपयांच्या कर्जासाठी ६३२ अर्ज आले, त्यांपैकी बँकेनें ७½ लक्ष रुपयांचे ५२६ अर्ज मंजूर केले. ह्याच मुदतींत बँकेनें १२ प्राथमिक बँकांस ४९९ अर्जदारांस वांटण्यासाठी सुमारें ७ लक्ष रुपये दिले. बँकेच्या स्थापनेपासून आतांपर्यंत तिनें एकूण १३ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. प्राथमिक बँकांकडे कर्जफेडीचा एकहि हप्ता थकलेला नाहीं. प्राथमिक बँका कर्जदारांस ६ टक्के दरानें कर्ज देतात आणि त्या स्वतः प्रांतिक बँकेकडून ४½ टक्के दरानें कर्ज घेतात. अहवालाचे वर्षी प्रांतिक बँकेस १,८९६ रुपये नफा झाला त्यांतून गेल्या सालचा ६८० रुपयांचा तोटा वजा केला असतां ताळेबंदांतील नफा–तोटा खातीं १,२१६ रुपये रहातात. बँक स्थापन झाल्यास आतां अडीच वर्षें पूर्ण झालीं आहेत आणि तिचें काम हळुं हळु वाढत चाललें आहे. प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांचे व्यवहार ज्या मानानें वाढतील त्या मानानें प्रांतिक बँकेचें कामहि वाढेल. प्रांतिक बँकेजवळ कर्जें देण्यास पुरेसा पैसा आहे, त्या मानानें त्याचा विनियोग होणें इष्ट आहे. प्राथमिक बँकांच्या प्रगतीवरच प्रांतिक बँकेची प्रगति अवलंबून आहे. सर गोविंदराव प्रधान हे बँकेचे अध्यक्ष असून श्री. व्ही. बी. मर्ढेकर हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. बँकेची वार्षिक साधारण सभा ता. २० सप्टेंबर रोजीं झाली.

### इस्लामपुर अर्बन को. बँक लि.

वरील बँकेचा तिसरा वार्षिक अहवाल आमचेकडे आला आहे. बँकेच्या पटावर ९५ सभासद असून त्यांनीं ४,७५५ रुपयांचे भाग घेतलेले आहेत. बँकेकडील ठेवींत एका वर्षाचे अवधींत दुपटीनें वाढ होऊन १९३७-३८ अखेर तिचेकडे ३१½ हजारांच्या ठेवी आहेत. बँकेनें एकूण २०,८६० रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत, त्यांपैकीं कॅशक्रेडिट आणि मालतारण ह्या व्यवहारांत थकबाकी राहिलेली नाहीं. अहवालाचे वर्षी बँकेस ७९७ रु. नफा झाला. बँकेच्या खर्चाचें एकूण भांडवलाशीं प्रमाण शेकडा १·५ इतकें पडतें. बँकेनें अल्पावधींत चांगली प्रगति केली आहे.

### मद्रास प्रांतांतील सहकारी चळवळ–चौकशी कमिटीची नेमणूक

कोइमतूर डिस्ट्रिक्ट अर्बन बँकेच्या रौप्यमहोत्सवाचे प्रसंगीं भाषण करतांना, मद्रास प्रांताच्या उद्योग खात्याचे मंत्रि, ना. गिरी, ह्यांनीं मद्रास प्रांतांतील सहकारी चळवळीच्या पुनर्घटनेविषयीं सूचना करण्यासाठी एका कमिटीची नेमणूक करण्यांत येणार असल्याचें जाहीर केलें. दुय्यम धंदे सहकारी तत्त्वावर चालविण्याकडे लोकांनीं विशेष लक्ष पुरवावें, असेंहि ते म्हणाले.

### सांगली सं. सहकारी पतपेढी लि.

वरील पतपेढीकडे सभासदांचें येणें ११,२२२ रुपये आहे. मे, १९३८ अखेर संपलेल्या वर्षी पतपेढीला ७०९ रु. ५ आ. ७ पै नफा झाला.

दि गुड-वुइल
ॲशुअरन्स कंपनी लि.
पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल
विमेदारांस
भरपूर सवलती माफक हप्ते
ठिकठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर

CONFIDENCE
is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its
YEARS OF
Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service
HAS CREATED
PUBLIC CONFIDENCE
The following figures will convince you :
NEW BUSINESS
Last year 1936-37
Exceeds
2 CRORES & 82 LAKHS
BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20
HINDUSTHAN
Co-operative Insurance Society, Ltd.
( ESTD. 1907 )
*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Office* : throughout India & the East.
S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.
POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## मुंबई प्रांतांतील मोटारी आणि त्यांचे अपघात

सन १९३६-३७ मध्यें मुंबई प्रांतांत एकूण २१,५८१ मोटार हाकण्याचे परवाने देण्यांत आले, त्यांपैकी ४,९१६ नवीन होते. माल वाहणाऱ्या ४६५ लॉऱ्या, ४,९३६ मोटार बसेस आणि ७३६ टॅक्सी ह्यांस भाडें करण्यास परवाने दिले होते. वरील सर्व प्रकारच्या परवान्यांबाबतच्या फीचें उत्पन्न १ लक्ष, ५४ हजार रुपये झालें. मोटारींच्या अपघातासंबंधीं तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत:—

मोटारींचे अपघात

| | १९३२-३३ | १९३६-३७ |
|---|---|---|
| एकूण अपघात | १,०२० | १,६९९ |
| खासगी मोटारींचे अपघात | ४५४ | ९७३ |
| भाड्याच्या मोटारींचे अपघात | ५६६ | ७२६ |
| अपघातांत सांपडलेल्यांची संख्या | १,४४९ | १,९५४ |
| मरण पावलेले | ११८ | १७५ |
| जखमी झालेले | १,३३१ | १,७७९ |

एकूण अपघातांची संख्या गेल्या पांच वर्षांत वाढलेली दिसून येते, परंतु त्यांत सांपडणाऱ्या मोटारींत खासगी मोटारींचें संख्याधिक्य होऊं लागलेलें आढळतें. भाड्याच्या मोटारींच्या अपघातांची संख्या त्यांच्या वाढत्या संख्येच्या प्रमाणांत फुगत चाललेली नाहीं.

मुंबई शहरांत एकूण ८९२ भाड्याच्या टॅक्सी आहेत, त्यांची दर मार्चमध्यें आणि ऑक्टोबरमध्यें तपासणी होते. त्या शहरांत ६६ लॉऱ्या आणि २६४ बसेस ह्यांस भाडें करण्याची परवानगी आहे. मोटारींच्या एकूण ४,९३९ अपघातांपैकीं १०७ अपघातांत प्राणहानि झाली आणि त्यांत १०७ लोक मृत्युमुखीं पडले. ह्यांपैकीं २८ अपघातांतील मोटारींच्या सारथ्यांवर खटले भरण्यांत आले, त्यांतील ६ जणांस शिक्षा झाली. ८ खटले अद्याप चालू आहेत. १०७ अपघातांची दिवसाच्या वेळेप्रमाणें वर्गवारी खालीलप्रमाणें करतां येईल:—सकाळीं ७ ते दुपारीं १२ : ३१; दुपारीं १२ ते सायंकाळीं ५ : २६; सायंकाळीं ५ ते रात्रीं १० : ४० आणि रात्रीं १० ते सकाळीं ७ : १०.

## थर्ड पार्टी इन्शुअरन्सची माफी मिळविण्याचा अयशस्वी प्रयत्न

मोटार व्हेइकल्स बिलांतील एका कलमान्वयें मोटार मालकांवर थर्ड पार्टी इन्शुअरन्सची सक्ती करण्यांत यावयाची आहे. अकौंटंट जनरलकडे जो मोटार मालक एक लक्ष रुपये अनामत ठेवण्यास तयार असेल, त्यास विम्याची वरील योजना लागू पडूं नये, अशी बिलांत दुरुस्ती करण्याचा युरोपियन गटानें मध्यवर्ती असेंब्लींत प्रयत्न केला, परंतु तो अयशस्वी झाला. मोठ्या मोटार कंपन्यांस ह्या माफीमुळें विनाकारण फायदा होईल, इतरांच्या विम्याचे दर त्यामुळें वाढतील आणि मोटारींची संख्या लक्षांत न घेतां मोघम एक लक्ष रुपयांचा अनामत रकमेचा आकडा ठरविणें अव्यवहार्य आहे, इत्यादि मुद्दे विरोधी पक्षानें पुढें मांडले. सरकारनें युरोपियन गटास पाठिंबा दिला, परंतु उपसूचना नापास झाली.

## पराडकर टेलरिंग ॲकॅडिमी, पुणें

### ३१ वा वाढदिवस समारंभ

वरील संस्थेच्या ३१ व्या वर्षाचा वाढदिवस समारंभ रविवार ता. ११ रोजीं प्रो. डॉ. न. का. घारपुरे यांचे अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें साजरा झाला. समारंभास श्री. ग. वि. केतकर, श्री. पोपटलाल शहा, डॉ. पराडकर वगैरे मंडळी हजर होती.

संस्थेचे चालक श्री. वा. रा. पराडकर यांच्या "शास्त्रीय शिक्षणांत प्रत्यक्ष धंदेशिक्षणाची जरुरी" या विषयावर विवेचनात्मक भाषणानंतर अध्यक्षांचें माहितीपूर्ण भाषण झालें. त्यांनीं संस्थेंतील शिक्षण-पद्धतीबद्दल गौरवपूर्ण उल्लेख करून समाधान व्यक्त केलें.

रात्रीं श्री. म. रा. पराडकर, बी. ए. यांनीं लिहिलेल्या 'दत्तक विधान' या नाटिकेचा प्रयोग ॲकॅडिमींतील विद्यार्थ्यांनीं यशस्वी रीतीनें करून दाखविला.

## डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, पुणें

या संस्थेंतून चालू सालीं कॉर्पोरेशन ऑफ अकौंटंट्स, ग्लासगो या संस्थेच्या इंटरमीजिएट व फायनल परीक्षेसाठीं तीन विद्यार्थी पाठविण्यांत आले होते ते तीनहि पूर्णपणें यशस्वी झाले.

### इंटरमीजिएट परीक्षा

१ कापरे वि. रा.
२ रायचूरकर अ. भि.

### फायनल परीक्षा

१ परांजपे द. वि.

तसेंच, या संस्थेनें इंडियन मर्चंटस चेंबर, मुंबई या संस्थेच्या डि. कॉम. परीक्षेस एकूण २२ विद्यार्थी पाठविले होते त्यांत १३ पूर्ण यशस्वी झाले असून कांहींनीं अकौंटन्सी, कंपनी लॉ, मर्कन्टाईल लॉ, सेक्रेटरीशिप या विषयांत विशेष यश (डिस्टिंक्शन) संपादन केलें आहे. संस्थेचा शिक्षकवर्ग, लायक व अनुभवी असल्यानें व विद्यार्थ्यांविषयीं सहानुभूतीनें वागण्याच्या त्यांच्या धोरणामुळें विद्यार्थी वर्गास संस्थेचा योग्य तो फायदा घेतां येतो. संस्थेंत शॉर्टहँड व टाईपरायटिंग शिकविण्याचीहि सोय आहे.

## श्री. नरीमन यांची झारापकर टे. कॉलेजला भेट

पुणें येथील झारापकर टेलरिंग कॉलेजला श्री. नरीमन यांनीं भेट देऊन कॉलेजमधील उत्कृष्ट शिक्षण-पद्धतीबद्दल समाधान व्यक्त केलें. सदरहु प्रसंगीं त्यांच्या हस्तें संस्थेंतील एक विद्यार्थी श्री. एकनाथ रामचंद्र हळवे यास संस्थेचा पहिल्या वर्गाचा व गव्हर्मेंट सर्टिफिकेट लंडन डिप्लोमा देण्यांत आला.

## पूर्व खानदेश को. इन्स्टिट्यूट

या जिल्हा शाखा को. इन्स्टिट्यूटची वार्षिक साधारण सभा बुधवार ता. २८।९।३८ रोजीं सकाळीं ८॥ वाजतां नटवर थिएटरमध्यें भरणार आहे.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
गेस्ट हाउस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक-पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

## सोलापूर जिल्ह्यांतील लँड मॉर्गेज बँक

ज्यांना लांब मुदतीचीं व मोठाल्या रकमांचीं कर्जे पाहिजे आहेत अशा शेतकऱ्यांची जास्तीत जास्त सोय व्हावी म्हणून अनेक ठिकाणीं लँड मॉर्गेज बँकांची स्थापना करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे.

मुंबई इलाख्याच्या मध्यभागांत अशा दोन बँका सहकारी कायद्याखालीं नोंदलेल्या असून त्या सध्या काम करीत आहेत. अशा स्थानिक लँड मॉरगेज बँकांना मुंबई येथील प्रॉव्हिन्शिअल लँड मॉरगेज बँक (मध्यवर्ती प्रांतिक लँड मॉरगेज बँक) द्रव्यसहाय करणार आहे. अशा स्थानिक बँकांचें कार्यक्षेत्र संबंध जिल्हाभर पसरावयाचें आहे. मध्यवर्ती प्रांतिक सहकारी लँड मॉरगेज बँकेनें डिबेंचरें (कर्जरोखे) काढून जरूर तो पैसा उभा केलेला आहे आणि मुंबई सरकारनें अशा डिबेंचराबद्दल व त्यांवरील व्याजाबद्दल हमी दिलेली आहे. लँड मॉरगेज बँकांचा मुख्य हेतु लांब मुदतीचीं कर्जे प्रामुख्यानें जमीन सुधारण्यासाठी देणें हा आहे. स्थानिक लँड मॉरगेज बँका दरसाल दर शेकडा ६ टक्के व्याजानें अशा रकमा शेतकऱ्यांना देणार आहेत. जर भरपूर तारण मिळण्यासारखें असेल व जर परतफेड करण्याची शेतकऱ्यांची खरोखरी ताकद असेल तर पूर्वीच्या सावकारांचे मोठाले बोजे निवारण्यासाठी देखील शेतकऱ्यांना या बँका कर्जे देतील. आपल्या चरितार्थासाठी व चालू शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी विकत घेऊन नंतर उरलेल्या उत्पन्नांतून हें लांब मुदतीचें कर्ज फिटण्यासारखें आहे किंवा नाहीं ही गोष्ट परतफेडीची ताकद अजमावतांना मुख्यतः लक्षांत घेतली जाईल.

अशा लँड मॉरगेज बँकाचें कार्यक्षेत्र जितकें संकुचित असेल तितकें तें सुरवातीला सोयीचें पडतें आणि म्हणून दोन अगर तीन तालुक्यांपुरतें हें क्षेत्र मर्यादित करणें अधिक श्रेयस्कर आहे. जर सुमारें एक लाख रुपयांचा व्यवहार या स्थानिक बँकांच्या हातून झाला तर त्या नफ्यांत चालूं शकतात आणि त्यांना आपल्या ऋणकोवर जरूर ती व्यक्तिशः देखरेख ठेवून त्यांच्याशीं निकट संबंध ठेवणें शक्य होतें.

लँड मॉर्गेज बँका स्थापन करण्यासाठी कोणतीं ठिकाणें सोयीचीं आहेत याबद्दल तपास करतां, खालील ठिकाणीं या बँका स्थापन केल्या असतां त्या यशस्वी होण्याचा संभव आहे असें आढळून आलें.

| जिल्हा | ठिकाण |
|---|---|
| सोलापूर | सोलापूर |
| अहमदनगर | कोपरगांव |

या ठिकाणीं अशा बँका स्थापन करण्यापूर्वी त्या यशस्वी होण्यासारखी परिस्थिति अस्तित्वांत आहे किंवा नाहीं, या बँकांचा कारभार हातीं घेण्यासारखीं स्थानिक माणसें मिळण्यासारखीं आहेत किंवा नाहींत आणि जरूर तें भागांचें भांडवल जमण्यासारखें आहे किंवा नाहीं याबद्दल प्रथम खात्री करून घेणें आवश्यक आहे. या कामाचा विचार करण्यासाठी लवकरच ठिकठिकाणीं सभा भरणार आहेत. ज्या त्या ठिकाणचे प्रमुख शेतकरी, कार्यकर्ते आणि या कामाबद्दल सहानुभूति असणारे इतर सद्गृहस्थ यांनीं अशा सभांस अवश्य हजर रहावें आणि चर्चेत भाग घ्यावा व त्याचप्रमाणें जरूर तें भांडवल उभारण्याच्या कामांत शक्य तितक्या सढळ हातानें मदत करावी अशी आमची विनंती आहे.

सोलापूर
ता. ४-९-१९३८

(सही) जी. के. प्रधान.
जी. डी. सी. ए.
ऑडिटर, को. सो.
सोलापूर.

---

## नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को बँक लि०

(वार्षिक सभा : २५-९-३८)

३० जून, १९३८ अखेर बँकेच्या पटावर १८०६ व्यक्ती आणि २९ सोसायट्या मिळून १८३५ सभासद आहेत. बँकेचें भरणा झालेलें भांडवल १,०२,८४० रुपयांचें असून तिचेकडे सुमारें ११½ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. रिझर्व्ह फंड, इमारत फंड, बुडीत कर्जफेड फंडवगैरेंतून मिळून २ लक्ष १३ हजार रुपये आहेत. सभासदांकडे २ लक्ष १४ हजार रुपये कर्ज येणें आहे. थकबाकी ३ लक्ष ९२ हजार रुपये आहे. ही बाकी जरी विशेष कमी झाली नसली तरी वसूल होणाऱ्या रकमेपेक्षां जास्त नवीन कर्ज न देण्याची दक्षता बोर्डानें बाळगलेली आहे. कॅश क्रेडिटची येणे रक्कम ४ लक्ष, ४० हजार रुपये आहे. बँकेनें सोन्याचे तारणावर ३ हजार रुपये, कापसाचे तारणावर ८½ हजार रुपये आणि धान्याचे व इतर मालाचे तारणावर २०½ हजार रुपये दिलेले आहेत. इतर बँकांकडे ठेवींत नगर बँकेचे ४ लक्ष ६३ हजार रुपये आहेत, परंतु त्यावर व्याज कमी मिळत असल्यानें ह्या रकमा सरकारी रोख्यांत गुंतविण्याचा बोर्डाचा विचार आहे. ताळेबंदांतील रोख्यांची किंमत १ लक्ष, ५६ हजार रुपये आहे, परंतु त्यांची बाजारभावानें होणारी किंमत २५½ हजारांनीं ज्यास्त आहे. ही परिस्थिति निःसंशय समाधानकारक आहे. सेफ डिपॉझिट व्हॉल्टची योजना बोर्डापुढें असून, ती पुरी झाल्यावर साधारण सभेपुढें मंजुरीसाठी ठेवण्यांत येईल. बँकेच्या स्वतःच्या इमारतीचें बांधकाम चालू वर्षांत पुरें होईल, अशी अपेक्षा आहे. अहवालाचे सालअखेर बँकेस ३५½ हजार रुपये नफा झाला, त्यांतून ७½% दरानें भागीदारांस डिव्हिडंड देण्यास ७,६५५ रुपयांचा विनियोग करावा, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. बँकेची सर्वांगीण प्रगति होत आहे, तथापि थकबाकीच्या परतफेडीकडे सभासदांनीं अधिक लक्ष देणें आवश्यक दिसतें.

---

## दि कोऑपरेटिव्ह पीपल्स बँक लि., लिंब

वरील बँकेचे ६१ सभासद असून भाग भांडवल ३,४२५ रुपये आहे. एकूण ठेवी १६,६४५ रुपयांच्या आहेत. ५८ सभासदांकडे २१½ हजार रुपयांचें कॅश क्रेडिट कर्ज येणें आहे. "या खात्याचा वसूल व्हावा तसा होत नाहीं त्यामुळें थकबाकी वाढत आहे" असा बँकेच्या अहवालांत उल्लेख आहे. बँकेचे लवादी सभासद १० झाले असून त्यामध्यें बँकेचे सुमारें ५ हजार रुपये गुंतलेले आहेत. थकबाकी कमी झाल्याविना बँकेची परिस्थिति समाधानकारक रहाणार नाहीं, ह्याची तिच्या चालकांस जाणीव आहे. जून, १९३८ अखेर संपलेल्या वर्षी बँकेस १,१६७ रुपये नफा झाला आहे. बँकेची वार्षिक सभा १२-९-३८ रोजीं झाली.

### दि बेळगांव पायोनियर अर्बन को. क्रेडिट बँक लि., बेळगांव

वरील बँकेचा ३० वा वार्षिक ताळेबंद आणि रिपोर्ट आमचेकडे आला आहे. बँकेच्या पटावर एकूण २४४६ सभासद असून तिचें भाग भांडवल १,३८,०८२ रुपये झालें आहे. बँकेच्या गंगाजळीत १ लक्ष २४ हजार रुपये आहेत आणि इतर फंड सुमारें ९५ हजारांचे आहेत. ७ लक्ष, ७० हजार रुपयांच्या तिचेकडे ठेवी आहेत. ह्या सर्व आंकड्यांत सालोसाल समाधानकारक वाढ होत आली आहे आणि बेळगांव शहरांत इतर ( जॉइंट स्टॉक ) बँकांची संख्या वाढली असली तरी त्यांचा वरील अर्बन बँकेवर मुळींच परिणाम न होतां तिची प्रगति चालू आहे, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. बँकेच्या जिंदगीमध्यें १ लक्ष, ६३½ हजार रुपये सरकारी रोख्यांत गुंतविलेले दाखविले आहेत; तथापि ताळेबंदाचे तारखेस त्यांची किंमत १ लक्ष, ७९ हजार रुपये होत आहे. म्हणजे सुमारें १६ हजारांचा हा गुप्त रिझर्व्ह राहिला आहे. थकबाकीचें प्रमाण गेल्या वर्षी शे. २०·८ होतें तें अहवालाचे सालीं उतरून शे. १७·१ इतकें झालें, हें बँकेच्या त्या बाबतच्या प्रयत्नांचें फळ आहे. वर्षअखेर बँकेस निवळ वाटण्याजोगा २५,७०८ रु. १५ आ. ४ पै नफा झाला, त्यांतून भागीदारांस ७½ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यासाठी १० हजार रुपये मंजूर झाले. वरील वृत्तांतावरून बँकेच्या सुस्थितीची आणि तिच्या प्रगतिपर व्यवस्थेची कल्पना येईल. बँकेची वार्षिक साधारण सभा ता. १७ रोजीं भरली होती.


मुलांमुलींकरितां नमुनेदार व उपयुक्त मासिक

**आनन्द**

**वार्षिक वर्गणी-मोठा अंक २ रु. लहान अंक १ रु.**

जुलै १९३८ च्या खास अंकापासून ३३ वें वर्ष सुरू. वर्गणीदार होऊन हें मासिक घेऊन पाहिल्याशिवाय त्याची खरी किंमत कळणार नाहीं. दरमहा नवे नवे पण उपयुक्त व आकर्षक विषय : उठावदार व स्पष्ट चित्रें : नव्या नव्या कल्पना व नवी नवी माहिती यांनीं प्रत्येक अंक सजविलेला असतो. जानेवारी १९३९ चा अंक अगदीं लहान मुलांसाठीं मोठ्या टाइपांत व आकर्षक दोन रंगांत काढणार आहोंत. जुलै १९३८ व जानेवारी १९३९ हे दोन खास अंक वरील वर्गणींतच वर्गणीदारांस मिळतील. पत्ता—**आनंद कार्यालय, पुणें २.**


### मुसावळ पीपल्स को. बँक लि.

वरील बँकेच्या सभासदांची संख्या ५८१ असून भरणा झालेलें भांडवल ७५ हजार रुपये आहे. बँकेचा रिझर्व्ह फंड सुमारें २९ हजारांचा आहे आणि इतर फंडांत सुमारें २९½ हजार रुपये आहेत. बँकेकडे ५ लक्ष, ३५½ हजारांच्या ठेवी आहेत. बँकेनें ३ लक्ष ६८ हजार रुपयांचीं कर्जें ओव्हरड्राफ्ट आणि कॅश क्रेडिट्स दिलेलीं असून तिचें २ लक्ष, ८५ हजार रुपये रोख आणि इतर बँकांत ठेवी ह्यांचे स्वरूपांत तरते आहेत. १० हजार रुपये तिनें सहकारी बँकांचे भागांत गुंतविले आहेत. दोन महिन्यांपेक्षा अधिक थकलेल्या कर्जाचें एकूण कर्जाशीं प्रमाण ९·७८% असून तें समाधानकारक आहे. बँकेनें अहवालाचे सालीं लवाद प्रकरणांतील घरें विकत घेतलीं, त्यांची किंमत ११ हजार रुपये आहे. हीं घरें योग्य किंमत येतांच विकून टाकण्यांत येतील. अहवालाचे सालीं बँकेनें १७½ लक्ष रुपयांचा हुंड्यांचा व्यवहार केला. बँकेच्या कचेरीची इमारत चालू वर्षी बांधून पुरी होईल, अशी अपेक्षा आहे. अहवालाचे साल अखेर बँकेस १६½ हजार रुपये नफा झाला, त्यापैकीं ४,४८९ रु. १२ आणे इतक्या रकमेचा विनियोग भागीदारांस ६ टक्के दरानें डिव्हिडंड देण्याकडे करावा, असें डायरेक्टर बोर्डानें सुचविलें. बँकेचा नफा वाढला असूनहि डिव्हिडंडचा दर ७½ टक्क्यांचा ६ टक्के करण्यांत आला, हें व्यवहारदक्षतेचें आणि सुज्ञतेचें निदर्शक आहे. बँकेची वार्षिक सभा ता. १०-९-३८ रोजीं भरली होती.


**DECCAN BOOK STALL**

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.



# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,३४,४५० वसूल झालेलें भांडवल १,१७,१६५

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

**M. V. GOKHALE,**
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११५—२ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०२–१२ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०७–१४ |
| ३½% चिनमुदत ... ... ... ... | ९६—४ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०५—८ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९९–१२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | १०९—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०८—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड ( ७० वर्षे मुदत ) | १०८—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... ... | १११—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२२—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १३८—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११२—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | २८–१२ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५३०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ६% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११३—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०२—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९७—४ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९३७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७२०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | ११४—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १९०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १७२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३७२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६००—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १८९—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४१—८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १९—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३७—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४२९०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०७—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १५४—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २९८—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १३६५–० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ७ रु. ८ आ. ... | १११—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३६–०–९ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५१-११-० |


**Very useful for Central and Urban Co-operative Banks and Societies.**

# " URBAN BANKS "

BY

L. K. BHAGWAT,

*Chief Accountant,*

**Bombay Provincial Co-operative Bank, Ltd.**

The book written in English, besides fully, describing the structure and functions of all types of Urban Banks, supplies practical hints to actual workers on the proper conduct of their day to day business including maintenance of accounts and records, cheques, endorsements, bills, audit, annual closing &c. **Principal Tannan** remarks in his foreword: "The book will show the reader the way to keep the co-operative house in the order expected of it." Price Rs. 2. Postage extra. Copies can be had from L. K. Bhagwat, Vincent Road, Plot No. 168 A, Dadar, Bombay 14

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult

**V. G. & Sons**

ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

शेअरवर चांगलें डिव्हिडंड वाटणाऱ्या
एका कारखान्याला ६ महिने ते ५ वर्षें मुदतीच्या

**ठेवी घेणें आहेत**

व्याज मुदतीप्रमाणें द. सा. द. शें. ४ ते ६ टक्के दिलें जातें. माहिती मागवितांना रक्कम किती व केव्हां गुंतविणें आहे तें लिहावें.
आत्माराम रावजी भट, C/o केसरी कचेरी, पुणें २.

पूर्वीची कर्जयोजना चालू असून शिवाय कर्जखातें नं. २ नें

**द. म. द. शें. ४चार आणे व्याजानें**

व

**अनुक्रमानें रु. १०० ते २०००**

देण्याची नवीन योजना. लवकर अर्ज करा; लवकर कर्ज मिळवा. त्वरा करा आणि प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठी ०२ आण्याची तिकिटें पाठवा अगर समक्ष भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

हेड ऑफिसः-गिरगांव, मुंबई. ब्रँचः-लक्ष्मी रोड, पुणें नं. २.

अप-टु-डेट शिलाई करतां

**महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा**

बुधवार चौक, पुणें | १२ तासांत कपडे शिवून मिळतील. | [ खाडी भांडाराचे माडीवर

---

**फराडकर टेलर्स ॲकॅडिमी**

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )

येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

---

**सुप्रसिद्ध संचालक मंडळ** व नामांकित व्यवहारपटु डायरेक्टर असलेल्या एका सुप्रसिद्ध विमा कंपनीकरितां महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोमांतक प्रांतांत विमा शास्त्राचा पूर्ण अनुभव असलेल्या गृहस्थांना भरपूर पगार व कमिशनवर नेमणें आहे.

**दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.**

( हेड ऑफिस : जळगांव )

माहिती मागवा | चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, लक्ष्मी रोड, पुणें २

---




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

**झारापकर टेलरिंग कॉलेज**

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

---

**'अभिनंदनीय प्रगति'** असेच बोल नाशिकच्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधि व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.

लिहा अगर भेटा. | मॅनेजिंग डायरेक्टर

---

**सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व बर्फी वापरा**

मोती चौक : : : सातारा

---

**'अर्थ' ग्रन्थमाला**

१ बँक आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली

---

**K. K. & Co.**

Photographic Dealers

POONA.

---

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.